# कोल्होबाची युक्ती

वैशाखाच्या उन्हानं
वनराज त्रासले
घाम पुसून पुसून
हात दुखू लागले
कोल्होबा प्रधान
त्यांचे खूप हुशार
डोके लढवून त्यांनी
आणली ना बहार
थेट गेले शहरात
आणला एक कुलर
तेव्हापासून थांबला
उन्हाचाही कहर
कोल्होबाची युक्ती
किती सफल झाली
वनराजांची त्यांची
पाठ थोपटली

- प्रकाश रामचंद्र क्षीरसागर
ताळगाव गोवा